## अर्पणपत्रिका

माझ्या शिक्षणाचा 'श्रीगणेशा'

ज्यांनी करुन दिला ते माझे स्वर्गीय बाबा व आण्णा

यांना सादर अर्पण...

# ऋणनिर्देश

**'जिजाबाईकालीन कोल्हापूर राज्य'** या विषयावरील प्रस्तुत लघु शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. (इतिहास) पदवी परीक्षेसाठी सादर करताना प्रस्तुत संशोधकास अत्यानंद होत आहे. हा शोधप्रबंध अनेकांच्या मौलिक सहकार्यातून मार्गदर्शनातून आणि प्रेरणेतून पूर्ण करता आला याची मला पुरेपूर जाणीव आहे. म्हणूनच या सर्वांच्या प्रती ऋणनिर्देश व्यक्त करणे आणि त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करणे हे माझे परमकर्तव्य मानतो.

प्रथमत: या संशोधनाच्या कामात शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभाग प्रमुख, व माझे मार्गदर्शक आदरणीय गुरूवर्य **प्रा. डॉ. एम. ए. लोहार सर** यांनी मला बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांचा विषयाचा व्यासंग, संशोधनातील शिस्त, अनुभव आणि अखंड उत्साह मला सतत प्रेरणादायी ठरला, त्यांच्या अचूक मार्गदर्शनामुळेच मला संशोधनाचे कार्य पूर्ण करता आले. याबद्दल प्रा. डॉ. एम.ए.लोहार सरांचे आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणे मी पसंत करतो.

सतत प्रेरणा देणारे, इतिहास विभागातील आदरणीय प्रा. अरुण भोसले सर, प्रा. एम.पी.पाटील सर, प्रा बी.डी. खणे सर, श्री. अवनिश पाटील सर, डॉ.सौ. नंदा पारेकर मॅडम, डॉ.सौ. पी.ए. पाटील मॅडम, डॉ. कविता पाटील मॅडम आणि विभागातील लिपिक उदय खेडकर यांचे मला नेहमीच प्रोत्साहन व सहकार्य मिळाले या सर्व गुरूजनांचा मी ऋणी आहे.

या संशोधनाकामी मला मार्गदर्शनपर उपदेश करण्याचे जे मौलिक काम केले त्या व्यासंगी अभ्यासिका आदरणीय डॉ.सौ. मंजिरी कुलकर्णी मॅडम यांनी माझ्या मध्ये प्रबंध शिस्तबद्ध लिहिण्याची जाणीव सातत्याने निर्माण केली. त्यांनी वेळोवेळी दिलेल्या अमूल्य सूचना, त्यांचा विषयाचा व्यासंग मला प्रेरणादायी ठरला. त्याचप्रमाणे जेष्ठ इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार सर व प्रा. सुरेश शिखरे सर यांचेही मला बहुमोल मार्गदर्शन लाभले या सर्वाप्रती ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

तसेच माझे आदरणीय गुरूवर्य यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी येथील इतिहास विभाग प्रमुख, माझे प्रेरणास्थान डॉ. सौ. जे. जे. व्हटकर मॅडम तसेच प्रा. नागेश जाधव सर, प्रा.

सतिश रेळेकर सर, यांनीही माझ्या संशोधन कार्यात स्फुर्तिप्रद मार्गदर्शन केले. याबद्दल मी नम्रतापूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथ विभागातील श्री बापुसाहेब माने, श्री शफीक देसाई, तसेच दुर्मिळ हस्तलिखित ग्रंथ विभागातील श्री. गणेश नेर्लेकर यांचीही मला माझ्या संशोधनासाठी उपयुक्त, दुर्मिळ संस्कृत हस्तलिखित ग्रंथ भाषांतरित करण्याकामी मोलाची मदत झाली. तसेच कोल्हापूर पुराभिलेखागार मधील पुराभिलेखाधिकारी श्री गणेश खोडके यांच्या सहकार्याने मला महत्त्वपूर्ण अस्सल मोडी कागदपत्रे उपलब्ध झाली. त्याचबरोबर या मोडी कागदपत्रांचे मराठीमध्ये भाषांतर करण्यास मला श्री. पांडुरंग आंबले व श्री. लाटकर यांचीही मोलाची मदत झाली. तसेच राजु मुजावर सर, शिवाजी जाधव, उमाकांत राणिंगा, नामदेव पाटील व अंकुश गवस या सर्वांच्या विशेष सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो.

या संशोधन प्रबंधासाठी जरी मी रात्रंदिवस कष्ट घेतले असले तरीही ज्यांच्या कष्टाने मला शिकण्याची स्फूर्ती मिळाली ती माझी आजी लक्ष्मी, आई सीता, काका-काकी -श्री. लक्ष्मण गावडे व सौ.राजश्री गावडे तसेच श्री. विष्णू गावडे व सौ. प्राजक्ता गावडे, तसेच श्री. यशवंत गावडे व सौ. संगिता गावडे त्याशिवाय श्री. बामन यजदानी (बेळगाव), हे सर्वजण माझ्या यशाचे मानकरी आहेत.

यांचे आशीर्वाद हीच माझ्या शब्दसामर्थ्याची अक्षय शिदोरी आहे. त्यांचे स्वप्न साकार करून त्यांच्या ऋणातून मला उतराई व्हायचे नाही, ते ऋण मला कायम माझ्या शिरावरच घ्यायचे आहे.

तसेच हा प्रबंध पूर्ण करण्याकामी मला माझे धाकटे बंधू जानु, अमित, व्यंकटेश व बहीण सुनिता, स्वाती, विनया यांचेही बहुमोल सहाय्य लाभले.

या संशोधनासाठी मला नेहमी प्रोत्साहन देणारे माझे मित्र व मैत्रिणी यांचे ही मी आभार व्यक्त करतो.

हा प्रबंध अचूकपणे व वेळेत करून दिल्याबद्दल टंकलेखिका सौ. शितल अशोक पसारे **'राजोम टायपिंग सेंटर'** यांचाही आभारी आहे.

**श्री. बाबली गंगाराम गावडे**

**अभ्यासक**

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रस्तावना

महाराष्ट्राच्या इतिहासात आणि भूगोलातही कोल्हापूर राज्याचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. या राज्याची भौगोलिक रचना वैशिष्ट्यपूर्ण असल्याने त्याचे अस्तित्त्व शत्रूपासून सुरक्षित राहिले. याची प्रचिती हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छ.शिवाजी महाराजांनी कोल्हापूरच्या आसपासचा प्रदेश आपल्या स्वराज्याचा एक भाग बनविला त्यावरून दिसून येते. परंतु त्यावेळी स्वराज्याची राजधानी रायगड असल्याने कोल्हापूरला तेवढे राजकीय महत्त्व नव्हते. कोल्हापूरला खरा ऐतिहासिक दर्जा, महत्त्व प्राप्त झाले ते महाराणी ताराबाईं यांनी छत्रपतींची एक स्वतंत्र गादी म्हणून इ.स. १७१० मध्ये कोल्हापूर राज्याची स्थापना केल्यानंतरच ...

मराठी सत्तेच्या इतिहासात कर्तबगार पुरूषांच्या बरोबरीने राजघराण्यातील स्त्रियांनीही मराठा राज्याचे अस्तित्त्व, संवर्धन करण्याच्या कामी अतुल पराक्रम दाखविला. या कर्तबगार स्त्रिया मराठा राज्याचे नेतृत्त्व करण्यासाठी धैर्याने पुढे आल्या. त्यामध्ये महाराणी ताराबाई, राणी येसुबाई, राणी राजसबाई इ. कर्तबगार स्त्रियांचा विशेष उल्लेख करावा लागेल. कोल्हापूर राज्य संस्थापिका महाराणी ताराबाई विषयी आतापर्यंत अनेक इतिहास संशोधकांनी महत्त्वपूर्ण माहिती प्रकाशात आणली आहे. मराठ्यांच्या इतिहासात महाराणी ताराबाईची भूमिका, त्यांनी स्वराज्यासाठी दिलेले योगदान सर्वांना परिचित आहेच. पण त्याच तोडीची कर्तबगार अशी आणखी एक राणी मराठ्यांच्या इतिहासात पर्यायाने कोल्हापूर राज्यात आपल्या विशेष कर्तबगारीने १८ व्या शतकात उदयास आल्या. अशा थोर राणी म्हणजे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छ.शिवाजी महाराजांची नातसून, करवीर छ.संभाजी महाराज (पहिले) यांची कर्तृत्ववान पत्नी महाराणी जिजाबाई होय.

महाराणी जिजाबाई आपल्या कर्तबगारीने मराठ्यांच्या इतिहासात अजरामर झाल्या. त्यांनी तत्कालीन राजकीय पटलावर आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाची छाप पाडून कोल्हापूरच्या इतिहासात आपला वेगळा ठसा निर्माण केला. छ.संभाजी महाराजांच्या हयातीत त्यांचा राज्यकारभारात मोठा वाटा होता. छत्रपती घराण्यात स्वतःची राजमुद्रा धारण करणारी त्या पहिल्या राणी होत्या. कारभाऱ्यांच्या विरोधाला न जुमानता कुणबीणीकडून चालविलेला राज्यकारभार हे तर मराठ्यांच्या इतिहासातील एक आगळेवेगळे उदाहरण आहे. एकंदरीत या राणीने आपल्या राज्याचा दबदबा दक्षिण

महाराष्ट्रात निर्माण करून कोल्हापूर राज्याचे सार्वभौमत्त्व अबाधित राखले. ताराबाईंनी अथक कष्टातून स्थापन केलेले कोल्हापूर राज्य वाचवण्याचे व विस्तार करण्याचे महत्त कार्य महाराणी जिजाबाई यांनी केले. परंतु त्यांच्या जीवन व कार्यावर फारसे संशोधन झालेले दिसून येत नाही. मराठ्यांच्या पर्यायाने कोल्हापूर राज्याच्या इतिहासात महाराणी जिजाबाई यांनी केलेला राज्यकारभार मराठ्यांच्या इतिहासात स्वत:चा वेगळा ठसा उमटवून गेलेला आहे. त्यामुळे जिजाबाई यांचा कोल्हापूर राज्याच्या इतिहासातील योगदानाचा इतिहास संशोधकांनी फारसा अभ्यास केला नसल्याने, त्यांच्या कारकीर्दीतील अजूनही बऱ्याच घटना अप्रकाशित आहेत. त्यामुळे महाराणी जिजाबाई यांचा कोल्हापूर राज्याच्या इतिहासातील योगदानाचा, त्यांच्या उज्ज्वल कर्तुत्त्वांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. त्या अभ्यासातून मी महाराणी जिजाबाई यांच्या जीवनातील, पर्यायाने त्यांच्या कोल्हापूर राज्याच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण पैलूंचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत लघु शोध प्रबंधामध्ये महाराणी जिजाबाई यांच्या कौटुंबिक जीवनाची कहाणी नसून छ.संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर कोल्हापूरचे अस्तित्त्व नामशेष व्हायची जेव्हा वेळ आली, त्यावेळी मोठ्या धैर्याने त्या संकटाला सामोरे जाऊन, कोल्हापूर राज्याचे सार्वभौम व स्वतंत्र अस्तित्त्व टिकविण्यासाठी केलेले प्रयत्न. इंग्रज, पोर्तुगीज, पेशवे या बलाढ्य सत्तांच्या आक्रमणाविरुद्ध दिलेला लष्करी लढा. एकंदरीत राजप्रतिनिधी म्हणून १२-१३ वर्षे केलेला कोल्हापूरचा राज्यकारभार त्यामध्ये त्यांना आलेल्या अडचणी व त्या अडचणीवरही मात करून कोल्हापूर राज्यासाठी दिलेल्या योगदानाचा यामध्ये अभ्यास आहे.

प्रस्तुतचा हा लघु शोधप्रबंध एकूण सहा प्रकरणामध्ये विभागण्यात आला आहे.

पहिले प्रकरण हे - **'कोल्हापूर राज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी'** याविषयी असून यामध्ये कोल्हापूर राज्याच्या स्थापनेनंतर घडलेली इ.स. १७१४ ची रक्तहीन क्रांती आणि त्यामधून घडलेल्या सत्ता बदलातून कोल्हापूरच्या गादीवर आलेले छ.संभाजी महाराज यांच्या अखेरपर्यंत कोल्हापूर राज्यात घडलेल्या राजकीय घडामोडींचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

दुसरे प्रकरण हे **'जिजाबाई-पेशवे संबंध'** असे असून या प्रकरणात कोल्हापूरचे छ.संभाजी महाराजांच्या निधनानंतर कोल्हापूर गादीवर वारस नाही, या सबबेखाली पेशव्यांचे कोल्हापूर गादी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

हस्तक्षेपाचे धोरण, परंतु जिजाबाईला कोल्हापूरचे स्वतंत्र अस्तित्त्व टिकवायचे असल्याने त्याने पेशव्यांच्या धोरणाला केलेला विरोध त्यातून निर्माण झालेली तणावाची स्थिती रेखाटण्याचा प्रयत्न यामध्ये केला आहे.

तिसरे प्रकरण हे **'महाराणी जिजाबाईचा राज्यकारभार'** शी संबंधित असून यामध्ये छ.संभाजीच्या पश्चात महाराणी जिजाबाई या कर्तबगार राणीने स्वत: १२-१३ वर्षे कोल्हापूर राज्याचा कारभार केला खरा; परंतु त्या राज्यकारभारात कितपत यशस्वी झाल्या, तसे असल्यास या राज्याचा कारभार यशस्वीपणे चालविण्यासाठी असे कोणते खंबीर धोरण कोल्हापूर राज्यात राबविले. त्यांच्या कारभाराची पद्धत कशी होती. या संपूर्ण गोष्टीचा उलगडा करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे.

चौथे प्रकरण हे **'महाराणी जिजाबाई- पोर्तुगीज -इंग्रज संबंध'** असे असून या प्रस्तुत प्रकरणामध्ये पश्चिम किनाऱ्यावरील परकीय सत्ता पोर्तुगीज-इंग्रज या आरमारीदृष्ट्या बलाढ्य सत्तांनी कोल्हापूर राज्यात शिरकाव करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि महाराणी जिजाबाईंनी त्यांचे पारिपत्य करण्याच्या इराद्याने दिलेला लष्करी लढा. यामध्ये अखेर सरशी कोणाची झाली. इ. गोष्टींचा परामर्श घेण्याचा प्रयत्न यामध्ये केला आहे.

पाचवे प्रकरण हे **'जिजाबाईकालीन कोल्हापूर राज्यातील सामाजिक-धार्मिक परिस्थिती'** या संदर्भात असून त्यामध्ये जिजाबाईकालीन कोल्हापूर राज्यातील समाजजीवन, विविध धर्मातील सामाजिक चालीरीती, प्रथा, परंपरा, लोकावरील धार्मिकतेचा प्रभाव, ब्राह्मण-अब्राह्मण वाद यामध्ये महाराणी जिजाबाईंनी ब्राह्मणाशी बरोबरी राखण्यासाठी केलेले प्रयत्न. एकंदरीत त्या काळातील सामाजिक, धार्मिक परिस्थितीचे चिकित्सक विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

सहावे प्रकरण हे **'उपसंहारा'चे** आहे यामध्ये प्रस्तुत अभ्यासातून जे निष्कर्ष निघाले, जे नवे आकलन झाले ते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत लघु शोधप्रबंध लिहीताना मला काही महत्त्वपूर्ण अप्रकाशित अस्सल कागदपत्रे सापडली त्यामध्ये संस्कृत,(दुर्मिळ हस्तलिखित ग्रंथ) मोडी कागदपत्रे इत्यादींचा समावेश होतो. या कागदपत्रांचे योग्य परीक्षण करून उपलब्ध माहिती प्रबंधात समाविष्ट केली आहे. याशिवाय या अभ्यासासाठी विपुल प्रमाणात प्राथमिक आणि दुय्यम ऐतिहासिक साधनसामग्री उपलब्ध झाली.

प्रकाशित साधन सामुग्रीमध्ये मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषेत विपुल साधनसामग्री उपलब्ध आहे. विशेषत: डॉ. आप्पासाहेब पवार (संपा.) -जिजाबाईकालीन कागदपत्रे, ताराबाईकालीन कागदपत्रे, ताराबाई पेपर्स, तसेच मराठ्यांच्या इतिहासाची पोर्तुगीज साधने, वासुदेवशास्त्री खरे (संपा.) ऐतिहासिक लेख संग्रह, इचलकरंजी संस्थानचा इतिहास, मा.वि.गुजर (संपा.)- करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, स.मा. गर्गे (संपा.)-करवीर रियासतीची कागदपत्रे, करवीर रियासत, गो.स. सरदेसाई (संपा.) - पेशवे दप्तर, मराठी रियासत, वि.का. राजवाडे (संपा.) मराठ्यांच्या इतिहासाची साधने इ. या अस्सल ऐतिहासिक साधनांचा या अभ्यासासाठी वापर करण्यात आला आहे.

**(श्री. बाबली गंगाराम गावडे)**

**अभ्यासक**